**MHKO100007532018**

## नियमित दिवाणी दावा क्र. १४९/२०१८ निशाणी क्र. २० वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता याचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचे युक्तीवाद ऐकले तसेच प्रकरणातील कैफीयत, दावा व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. वादी यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा दाखल करतेवेळी मिळकतीचा सिटी सर्व्हेकडील प्रॉपर्टी कार्डाचा उतारा उपलब्ध न झालेमुळे दावा मिळकत १ड ग्रामपंचायत मिळकत नं. ३६९ याचा सिटी सर्व्हे नंबर लिहीणेचे राहून गेले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी यांनी आपल्या कैफीयतीमध्ये सुध्दात्याबाबतचे कथन करुन सि.स.नं. ३६९ ही मिळकत सुध्दा दावेत समाविष्ठ न केलेबाबतही मजकुर नमुद केला आहे. सबब अर्जदार यांनी त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मागीतली आहे.

४. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे सादर केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादी यांचा अर्ज चुकीचा व बेकायदेशिर असून कायदयाने चालणेस पात्र नाही. प्रतिवादी यांनी दावेस निशाणी क्र. १४ ला आपली कैफीयत दाखल केली आहे. त्याप्रमाणे निशाणी क्र. १६ वर मुद्दे काढणेत आले आहेत. वादी

यांनी काम लांबणीवर टाकणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वादी यांनी मागीतलेली प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसते. सदरच्या दुरुस्त्या केल्यामुळे दाव्यात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे प्रस्तावित दावा दुरुस्ती केलेमुळे प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु वादी यांनी सदरची दुरुस्ती ही दावा दाखल केल्यानंतर ब-याच दिवसांनी मागीतली असल्याने त्यांचेवर काहीअंशी खर्च बसविणे आवश्यक आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) खर्चादाखल देणेच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** वादी यांनी दाव्यात १४ दिवसाचे आत नियोजीत दुरुस्ती करावी दुरुस्त प्रत सत्वर अभिलेखावर दाखल करावी.

DHANASHRI MAHADEV PAWAR

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2023.08.17 17:32:17 +0530

ठिकाणः- गडहिंग्लज
दिनांक - १६/०८/२०२३

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज